**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University**
**Aurangabad – 431 004, Maharashtra, India**
NACC Re-accredited 'A' Grade
Office PBX : (0240) 24033900/400
Office Tele : (0240) 2403218 / 2403223
Affiliation : (0240) 2403118/119/115
Web Site : www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,**
**औरंगाबाद- ४३१ ००४, महाराष्ट्र, भारत**
**स्थापना वर्ष : १९५८**
नॅक समितीतर्फे 'अ' दर्जा प्राप्त
Office : Academic Section
कार्यालय :- शैक्षणिक विभाग (संलग्नीकरण)


संदर्भ क्रमांक: शैक्ष/संलग्न/२०२१-२२/ 8360-63 दिनांक:- १७-०२-२०२२

**प्रति,**
**प्राचार्य,**
**आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ संचलित,**
**के. टी. पाटील औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय,**
**सिध्दार्थ नगर, बार्शी रोड,**
**जि. उस्मानाबाद.**

**विषय:- शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून औषधनिर्माणशास्त्र (Pharmacy) विषयाच्या संशोधन केंद्रास मान्यता देणे बाबत.**

**संदर्भ:-** **१)** आपला संशोधन केंद्रासाठीचा प्रस्ताव.
**२)** प्रस्तावित संशोधन केंद्रासाठी तज्ञ समितीने सादर केलेला अहवाल दिनांक :- १२-०१-२०२२
**३)** महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १११ (१) ते (८) अन्वये निश्चित केलेले निकष
**४)** विद्यापीठ अध्यादेश १००९ (G) (१) ते (१२) अन्वये निश्चित करण्यात आलेले निकष
**५)** अधिष्ठाता मंडळाने दि. १८-०२-२०२२ व तहकुब बैठक दि. ०८-०२-२०२२ रोजी घेतलेल्या धोरणात्मक निर्णयानूसार केलेल शिफारस.
**६)** विद्यापीठ परिपत्रक दिनांक ०७-०७-२०२१
**७)** मा. कुलगुरु महोदयांनी दिलेली मान्यता दिनांक १७-०२-२०२२

महोदय / महोदया,

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने मा. कुलगुरु महोदयांनी दिलेल्या आदेशानूसार आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १११ (१) ते (८) व विद्यापीठ अध्यादेश १००९ (G) (१) ते (१२) विद्यापीठ परिपत्रक दिनांक ०७-०७-२०२१ अन्वये विहित केल्यानूसार विद्यापीठाने / अधिष्ठाता मंडळाने प्राप्त प्रस्तावाची छानणी / तपासणी करुन नियुक्त केलेल्या चौकशी / तज्ञ समितीने सादर केलेल्या अहवालानूसार **औषधनिर्माणशास्त्र (Pharmacy)** विषयाच्या संशोधन केंदास वर्ष २०२१-२२ पासून खालील कोष्टकात दर्शविण्यात आलेल्या अभ्यासक्रमानूसार प्रवेश क्षमतेसह मान्यता देण्यात येत आहे.

| अनु क्र. | महाविद्यालयाचे नाव | संशोधन केंद्राचे अभ्यासक्रमासह नाव | संशोधक मार्गदर्शकांची नावे | विद्यापीठाने निर्धारित केलेली प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|---|
| ०१ | आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाचे संचलित, के. टी. पाटील औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, सिध्दार्थ नगर, बार्शी रोड, जि. उस्मानाबाद. | **औषधनिर्माणशास्त्र (Pharmacy)** | १) डॉ. काझी एम. डी. अमेर इकबाल युसुफ अली.<br>२) डॉ. ए.एस. बिराजदार<br>३) डॉ. अमोल जोशी | १० प्रवेश क्षमतेसह नविन संशोधन केंद्रास सकारात्मक शिफारस करण्यात येते आहे. |

प्रस्तुत प्रकरणी अधिष्ठाता मंडळाने शिफारशित केल्यानूसार महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १११ (७) अन्वये विहित केल्यानूसार मा. कुलगुरु महोदयांना प्राप्त असलेल्या अधिकारा नूसार उपरोक्त कोष्टकात विनिर्दिष्टित करण्यात आलेल्या संशोधन केंद्रास मान्यता देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी आपणास असेही अवगत करण्यात येते की, सदरील संशोधन केंद्राची मान्यता शैक्षणिक वर्ष २०२१-२२ ते २०२३-२०२४ पर्यंत अनुज्ञेय राहील. सदरील संशोधन केंद्राच्या मान्यतेचा कालावधी संपण्यापूर्वी सहा महिने अगोदर विद्यापीठास पूनर्रमान्यता / पूनर्रसंलग्निकरणासाठी विहित शुल्क व पूरक दस्तऐजासह प्रस्ताव सादर करणे अनिवार्य राहील अन्यथा सदरील संशोधन केंद्राची मान्यता अपोआप संपूष्टात येईल, याची कृपया सर्व संबंधितांनी गांभीर्याने नोंद घेण्यात यावी.

प्र-कुलगुरु

**प्रतिलिपी:-**

१) **मा. संचालक**, उच्च शिक्षण, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य मध्यवर्ती इमारत, पूणे- ०१ यांना माहितीस्तव सादर.

२) **उपकुलसचिव**, पदव्युत्तर / पी.एच.डी. विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, जि. औरंगाबाद. यांना माहितीस्तव अग्रेषित.

३) **संचालक**, युनिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, जि. औरंगाबाद. यांना माहितीस्तव अग्रेषित.

प्र-कुलगुरु